## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

### दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी , अकोला

द्वारा संचालित

## श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला

## एक कदम स्वच्छता कि ओर....

**“ प्लास्टिक को हटाना है, देश को बचना है ”**

## स्वच्छ भारत अभियान

## अहवाल २०१९-२०

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

# श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

## स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान

## सत्र : २०१९-२०


| अ. क्र. Sr.no. | घटक (Particulars) | पान क्र. Page no. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | |
| २. | मुनिजन समिती व Action Plan | |
| ३. | अहवाल | |
| ४. | छायाचित्रे | |
| ५. | वृत्तपत्र कात्रणे | |

**प्रस्तावना**

**स्वच्छ भारत अभियान**




"२०१० मध्ये महात्मा गांधींच्या 150 व्या वाढदिवसानिमित्त स्वच्छ भारत ही सर्वात चांगली श्रद्धांजली ठरेल," श्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील राजपथ येथे स्वच्छ भारत मिशन सुरू करतांना सांगितले. २ ऑक्टोबर २०१९ रोजी स्वच्छ भारत मिशन ही राष्ट्रीय चळवळ म्हणून देशाच्या लांबी आणि रुंदीपर्यंत सुरू करण्यात आली. 2 ऑक्टोबर 2019 पर्यंत 'स्वच्छ भारत' ची दृष्टी मिळविणे हे या मोहिमेचे उद्दीष्ट आहे.

स्वच्छ भारत अभियान ही भारत सरकारची सर्वात महत्वपूर्ण स्वच्छता मोहीम आहे. श्री नरेंद्र मोदी यांनी इंडिया गेट येथे स्वच्छतेच्या प्रतिज्ञेचे नेतृत्व केले, ज्यात देशभरातील सुमारे तीस लाख सरकारी कर्मचारी सहभागी होते. त्यांनी राजपथ येथे वॉकथॉनला हिरवा झेंडा दाखविला आणि लोकांना काही चरणात सामील न होता त्यांनी भाग पाडले, परंतु सहभागींसह बरेच लांब कूच केले. स्वच्छतेसाठी व्यापक जनआंदोलनाचे नेतृत्व करीत असताना पंतप्रधानांनी महात्मा गांधींचे स्वच्छ व स्वच्छ भारत ठेवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लोकांना उद्युक्त केले. श्री नरेंद्र मोदी यांनी स्वत: मंदिर मार्ग पोलिस स्टेशनमध्ये स्वच्छता मोहीम सुरू केली. स्वच्छ भारत अभियानाला देशभरात जनआंदोलन म्हणून कचरा साफ करण्यासाठी झाडू उचलून पंतप्रधान म्हणाले की 'ना गंदगी करेंगे, ना करने देंगे' हा मंत्र त्यांनी दिला. श्री नरेंद्र मोदी यांनी नऊ लोकांना स्वच्छता मोहिमेमध्ये सामील होण्यासाठी निमंत्रण दिले आणि त्या प्रत्येकाला पुढाकार घेण्यासाठी आणखी नऊ जणांना आकर्षित करण्याची विनंती केली.

लोकांना मोहिमेचे निमंत्रण देऊन स्वच्छता अभियान राष्ट्रीय चळवळीचे रूप धारण केले आहे. स्वच्छ भारत चळवळीच्या माध्यमातून लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली

आहे. नागरिक आता देशभरात स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होत असल्याने, एकदा महात्मा गांधींनी पाहिलेले 'स्वच्छ भारत' हे स्वप्न साकार होऊ लागले आहे. पंतप्रधानांनी त्यांच्या शब्दांनी आणि कृतीतून लोकांना आग्रह करून स्वच्छ भारतचा संदेश पोहोचविण्यात मदत केली आहे. वाराणसीतही त्यांनी स्वच्छता मोहीम राबविली. क्लीन इंडिया मिशन अंतर्गत त्यांनी वाराणसीतील असी घाट येथे गंगा नदीजवळ कुदळ ठेवले. स्वच्छता अभियानात सहकार्य करणारे स्थानिक लोक मोठ्या संख्येने त्याच्यात सामील झाले. स्वच्छतेचे महत्त्व समजून घेत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी एकाच वेळी आरोग्य समस्यांकडे लक्ष वेधले आहे की जवळजवळ अर्ध्या भारतीय कुटुंबांना त्यांच्या घरात स्वच्छतागृहे नसल्यामुळे सामोरे जावे लागते. समाजातील विविध घटकांतील लोक पुढे येऊन या जनआंदोलनाच्या स्वच्छतेत सामील झाले आहेत. सरकारी अधिकारी ते जवान, बॉलीवूड कलाकार ते क्रीडापटू, उद्योगपती, अध्यात्मिक नेते या सर्वांनी उदात्त कार्यासाठी रांगा लावल्या आहेत. देशातील कोट्यवधी लोक भारत स्वच्छ करण्यासाठी सरकारी विभाग, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदाय केंद्रांच्या स्वच्छता उपक्रमांमध्ये दिवसेंदिवस सामील होत आहेत. नाटक व संगीताच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी वारंवार स्वच्छता मोहिमेचे आयोजन देशभर व्यापकपणे केले जात आहे.

स्वच्छ भारत मिशनमध्ये सहभागी होण्यासाठी आणि स्वच्छ भारताच्या दिशेने हातभार लावण्यासाठी लोक आणि विविध विभाग व संघटनांनी केलेल्या प्रयत्नांचे खुद्द पंतप्रधानांनी कौतुक केले आहे. श्री नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांच्या सहभागाचे नेहमीच कौतुक केले आहे. स्वच्छ भारत अभियानाचा भाग म्हणून देशभरातील नागरिकांकडून स्वच्छताविषयक कामांना उजाळा देण्यासाठी '# मायक्लियन इंडिया' देखील एकाच वेळी सुरू करण्यात आला. स्वच्छ भारत अभियान ही जनआंदोलन बनली असून जनतेचा मोठा पाठिंबा त्यांना मिळाला आहे. नागरिक देखील मोठ्या संख्येने बाहेर आले आणि स्वच्छ आणि स्वच्छ भारतासाठी वचन दिले. स्वच्छ भारत अभियान सुरू झाल्यावर रस्त्यावर झाडू, कचरा साफ करणे, स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करणे आणि एक स्वच्छ वातावरण राखणे ही एक सराव झाली आहे. लोकांनी भाग घ्यायला सुरुवात केली आहे आणि **'स्वच्छता ईश्वर भक्ती नंतर आहे'** असा संदेश पोहोचविण्यात मदत केली आहे.

**SHRI R.L.T. COLLEGE OF SCIENCE, AKOLA**

**MUNIJAN FOR**

**SWACHHA BHARAT ABHIYAN (2014-2019) COMMITTEE**

| Sr.no | Designation | Name |
|---|---|---|
| 01 | Chief Programme Co-ordinator | Principal Dr. V.D. Nanoty |
| 02 | Program Co-ordinator | Dr. S. R. Kohchale |
| 03 | Program Co Co-ordinator | Dr. R. P. Joshi (Sawalkar) |
| 04 | IQAC Co-ordinator | Dr. R.L. Rahatgaonkar |
| 05 | Member | Dr. P.T. Agrawal |
| 06 | Member | Dr. R. D. Chandrawanshi |
| 07 | Member | Prof. R.D. Chaudhari |
| 08 | Member | Prof. Ku. S. B. Tadam |
| 09 | Member | Prof. P.R. Kawle |
| 10 | Member | Dr. Ku. A.G. Thakare |
| 11 | Member | Dr. A.G. Sarap |
| 12 | Member | Prof. P.P. Gedam |
| 13 | Member | Mr. K.Y. Patil |
| 14 | Member | Mr. D.J. Wankhade |

**(Dr. V. D. Nanoty)**

Principal,

Shri R.L.T. College of Science, Akola

# अहवाल

**अ) स्वच्छं भारत अभियान पंधरवडा शपथ (दि. १/०८/२०१९)**

विभागीय संचालक, युवा कल्याण व क्रीडा विभाग, भारत सरकार यांच्या पत्रानुसार महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी “स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा” शपथ दि. ०१/०८/२०१९ (गुरवार) रोजी महाविद्यालयात घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी होते तर प्रमुख अतिथी रा. से. यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे होते.

प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाची सुरुवात “स्वच्छ भारत स्वस्थ भारत” शपथीने केली आणि सोबतच रा.से.यो. च्या सर्व स्वयंसेवकांनी सुद्धा स्वच्छता शपथ घेतली आणि प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना **“एक कदम स्वच्छता कि ओर....”** या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी लाभलेले प्रमुख अतिथी रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी “स्वच्छता पाळा रोगराई टाळा ” या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ह्रतुजा गोपनारायण हिने केले तर आभार प्रदर्शन अमिषा मिश्र हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. समाधान मुंडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल, प्राध्यापिका सोनाली गवांदे व इतर रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी परिश्रम घेतले.

**ब) महाविद्यालयीन परिसर स्वच्छता (दि. ०२/ ०८/ २०१९ ते ०५/ ०८/ २०१९)**

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी दि. ०२/०८/२०१९ ते ०५/०८/२०१९ या चार दिवसात महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, वर्ग खोल्या , प्रयोगशाळा , ग्रंथालय , बाथरूम , महाविद्यालयातील सभागृह, महाविद्यालयाच्या समोरील रस्ता व इतर परिसर ची स्वच्छता करण्यात आली . या स्वच्छता मोहीमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. व्ही. डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर), प्रा.डॉ.समाधान मुंडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल, प्राध्यापिका सोनाली गवांदे व रा. से. यो. च्या विद्यार्थासोबत स्वच्छता मोहीम उत्कृष्ठ रित्या राबविण्यात आली.

**क) स्वच्छते कडून समृद्धीकडे ग्राम आपोती खुर्दच्या लोकांना संदेश**
**(दि. ०६/०८/२०१९ ते १०/०८/२०१९)**

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी ग्राम सोनाळा येथे दि. ०६/०८/२०१९ ते १०/०८/२०१९ या पाच दिवसामध्ये गावातील लोकांना स्वच्छते बद्दल जनजागृती करण्यात आली. स्वच्छता आजच्या काळाची गरज आहे, स्वच्छता पाळा रोगराई टाळा अश्या विषयावर लोकांना सांगण्यात आले आणि स्वच्छता हि आपल्या स्वताच्या शरीरापासून सुरु करायची नंतर आपले घर , संडास , बाथरूम , घरासमोरील परिसर , गावातील रस्ता स्वच्छ ठेवायला

पाहिजे असे रा.से.यो. च्या विद्यार्त्यांकडून गावातील लोकांना सांगण्यात आले तर काही रा.से.यो. च्या विध्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेमध्ये जाऊन लहान मुलांना स्वच्छते बद्दल मार्गदर्शन केले व जी मुले स्वच्छ आहेत त्यांना चॉकलेट्स चे वाटप करून त्यांना आनंदित केले. लहान मुलांना आपले घर , आंगण , घरामोरील रस्ता, गावातील रस्ते स्वच्छ असतील तर आपण स्वस्थ आणि निरोगी राहू असे सांगण्यात आले आणि हाथपाय स्वच्छ ठेवणे, नखे कापणे इत्यांदी गोष्ठी सांगण्यात आल्या. गावातील महिलांना एक आगळावेगल्या पद्धतीनी संदेश देण्यात आला, "प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालून कापडी पिशवी वापरण्याचे आव्हान केले." पथनाट्याच्या सहायाने गावकर्यांमध्ये जनजागृती करून, त्यांना घरदार असेच स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. रोज ह्या स्वच्छता मोहिमे अंतर्गत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी ग्राम आपोती खुर्द, आपातापा च्या लोकांनमध्ये एक प्रकारचा स्वच्छते कडून समृद्धीकडे जाण्याचा संदेश दिला.

### ड) महापुरुष्याच्या पुतळ्याची स्वच्छता (दि. १४/०८/२०१९)

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयसेवकांनी दि. १४.८.२०१९ (बुधवार) रोजी अकोला बसस्थानकासमोरील मदनलाल धीग्रा चौकालगत असलेला ब्रिजलाल बियाणी यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करून तेथील आजूबाजूच्या लोकांना त्या परिसरात "एक कदम स्वच्छता कि ओर..... " असा संदेश रा. से.यो. च्या स्वयसेवकांतर्फे देण्यात आला. त्याचप्रमाणे नजीकच्या गांधी जवाहर उद्यानामधील राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडित जहाहार्लाल नेहरू या महापुरुष्याच्या पुतळ्यावर पाणी मारून स्वच्छता करण्यात आली तसेच उद्यानाच्या सर्व परिसराची स्वच्छता करण्यात आली. उद्यानाची स्वच्छता झाल्यानंतर प्रा. डॉ. समाधान मुंडे यांनी रा. से.यो. च्या स्वयसेवकांना "माझ्या घराची स्वच्छता म्हणजे माझ्या अंगणाची स्वच्छता ; माझ्या अंगणाची स्वच्छता म्हणजे माझ्या गावाची स्वच्छता ; माझ्या गावाची स्वच्छता म्हणजे माझ्या शहराची स्वच्छता; माझ्या शहराची स्वच्छता म्हणजे माझ्या भारत देशाची स्वच्छता " अश्या प्रकारचे मार्गदर्शन सुद्धा यावेळी करण्यात आले.

**राष्ट्रपिता गांधी ह्यांच्या १५० व्या जयंती निमित्य महाविद्यालयाच्या रासेयो तर्फे साप्ताहिक विविध कार्यक्रम राबविण्यात आले:**

दि.२४ सप्टेम्बर ते ०२ ऑक्टोबर २०१९ ह्या कालावधित महाराष्ट्र शासन उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. दि. २४ सप्टेम्बर रोजी "स्वच्छता हि सेवा" ह्या कथानकाच्या आधारावर महाविद्यालाचे परिसर स्वच्छ करण्यात आले. पूर्ण प्रांगण, खोल्या, बगीचा , रस्ते व सर्व परिसर स्वच्छतेचे धडे देत देत आव्हाहन केले गेले.

दि. २५ सप्टेम्बर रोजी दत्तक ग्राम आपोती(खुर्द) येथे जनजागृती करण्यात आली. गावात रासेयोच्या चमू नी घरोघरी, दारोदारी जाऊन गावकर्यांमध्ये स्वच्छतेचे व आरोग्याच्या रक्षणाचे बी रुजविण्याचे प्रयत्न केले गेले.

विद्यार्थ्यांच्या विविध प्रतियोगिता घेण्यात आल्या. निबंध स्पर्धा, विषय होते "प्लास्टिक फ्री इंडिया" आणि " गांधीजींच्या जीवनावर व त्यांचे कार्य " ह्या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यत आल्या. ह्या स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे काम केल्या गेले. रासेयोच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रातिसाद लाभला. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ.समाधान मुंडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल, प्राध्यापिका सोनाली गवांदे तसेच रासेयो चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोह्चाले व माननीय प्राचार्य डॉ. वी डी नानोटी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हे साप्ताह चांगल्या विविध रित्या राबविण्यात आले.

**बुधवार दि. ०२/१०/२०१९**

**रा. से. यो. चमू कडून महाविद्यालयात, १५० साव्या महात्मा गांधी जयंती निमित्य <u>"प्लास्टिक पिशव्यांवर बंदी":</u>**

दि.२ ऑक्टोबर २०१९ महात्मा गांधीजी ह्यांची १५० व्या जयंतीला श्री रा.ल.तो. विज्ञान महविद्यालयाच्या रासेयो पथकाने लायन्स क्लब, अकोला व अकोला महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय श्री संजयजी कापडणीस, आयुक्त म.न.पा. अकोला, हे होते. लायन्स क्लब अकोला चे जिल्हा अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी एका आगळ्या-वेगळ्या स्वछता कार्यक्रमाचे आयोजन केले. "Single plastic ban" ची संकल्पना साकारली व महाविद्यालयात कृतीत आणुन प्लास्टिक पिशव्यांना संपूर्ण बंदी घातली. प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालून कापडी पिशव्यांचे अनावरण केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचर्यांना तसेच विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली कि "आजपासून प्लास्टिक पिशव्यांवर संपूर्ण बंदी घालून कापडी पिशव्यांचा वापर करणार". अकोला म.न.पा. आयुक्त मा. श्री संजयजी कापडणीस ह्यांनी आपल्या आजूबाजूचे परिसर स्वच्छ ठेवण्याकरिता आव्हान केले. कार्यक्रमाच्या शेवटी स्वच्छता रेली चे आयोजन केल्या गेले. पथनाट्याच्या सहाय्याने व प्लास्टिक बंदीचे नारे लावत, पोस्टर्स वर घोषवाक्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. महाविद्यालाच्या वेबसाईट ची लिंक खाली दिली आहे, त्यामध्ये पथनाट्याचे व अकोला बस स्थानकावर स्वच्छता करतानाचे पुरावे आहेत.

महाविद्यालयाची वेबलिंक: http://rltsc.edu.in/?s=+gandhi+jayanti+

महाविद्यालयातील परिसरात प्लास्टिक पिशव्या बंदी चे फलक लावण्यात आले आहेत. प्रत्येक विभाग प्रमुखांना कापडी पिशवी व एक "Plastic bags ban" चे sticker-posters प्रदान करण्यात

आले जेणेकरून कि प्रत्येक विभाग बाहेर ते लावण्यात आले. महाविद्यालयाचे सुवर्ण जयंती वर्ष असल्याने हा एक आगळा-वेगळा प्रयोग करण्यात आला व खरोखर महाविद्यालयातील परिसरातून Plastic bags संपूर्ण बंद केल्या गेल्या आहेत. महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी ह्याच्या मार्गदर्शनाखाली हे करणे शक्य झाले आहे, ते नेहमीच समाजाच्या चांगल होवो ह्या भावनेने रासेयो चमू ल वेळोवेळी मार्गदर्शन करून साथ देत राहतात. त्यांचे मनापासून खूप खूप आभार.

**स्वच्छता शपथ**

महात्मा गांधी ने जिस भारत का सपना देखा था उसमें सिर्फ राजनैतिक आजादी ही नहीं थी, बल्कि एक स्वच्छ एवं विकसित देश की कल्पना भी थी।

महात्मा गांधी ने गुलामी की जंजीरों को तोड़कर माँ भारती को आज़ाद कराया।

अब हमारा कर्तव्य है कि गंदगी को दूर करके भारत माता की सेवा करें।

मैं शपथ लेता हूं कि मैं स्वयं स्वच्छता के प्रति सजग रहूंगा और उसके लिए समय दूंगा।

हर वर्ष 100 घंटे यानी हर सप्ताह 2 घंटे श्रमदान करके स्वच्छता के इस संकल्प को चरितार्थ करूंगा।

मैं न गंदगी करूंगा न किसी और को करने दूंगा।

सबसे पहले मैं स्वयं से, मेरे परिवार से, मेरे मुहल्ले से, मेरे गांव से एवं मेरे कार्यस्थल से शुरुआत करूंगा।

मैं यह मानता हूं कि दुनिया के जो भी देश स्वच्छ दिखते हैं उसका कारण यह है कि वहां के नागरिक गंदगी नहीं करते और न ही होने देते हैं।

इस विचार के साथ मैं गांव-गांव और गली-गली स्वच्छ भारत मिशन का प्रचार करूंगा।

मैं आज जो शपथ ले रहा हूं, वह अन्य 100 व्यक्तियों से भी करवाऊंगा।

वे भी मेरी तरह स्वच्छता के लिए 100 घंटे दें, इसके लिए प्रयास करूंगा।

मुझे मालूम है कि स्वच्छता की तरफ बढ़ाया गया मेरा एक कदम पूरे भारत देश को स्वच्छ बनाने में मदद करेगा।






दत्तक गरम आपोती खुर्द(आपातापा) येथे रासेयो चमू द्वारे प्रभात फेरी दरम्यान स्वच्छते विषयी जनजागृती करतांना व सांडपाण्याचे व्यवस्थापन करून गावकर्यांना रोग-राई पासून दूर राहण्याचे आव्हान करतांना स्वयंसेवक.






मुनिजन च्या माध्यमातून दत्तक ग्राम येथे रासेयो ची रॅली व पथनाट्याचे सादरीकरण






श्री रा.ल.तो. महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा दरम्यान पूर्ण परिसर स्वच्छ करतांना कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर व रासेयो चे स्वयंसेवक.






महाविद्यालयात २ ऑक्टोबर २०१९ ला १५० व्या गांधी जयंतीचे कार्यक्रम “Single Plastic Ban” ह्या विषयावर अकोला म.न.पा. आयुक्त मा. श्री. संजयजी कापडणीस मार्गदर्शन करतांना, मा. प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी, रासेयो कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे व इतर मान्यवर.







स्वच्छतेची शपथ घेतांना मान्यवर व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी आणि लायन्स क्लब अकोलाची पूर्ण टीम .




प्लास्टिक पिशव्यांवर संपूर्ण बंदी घालून कापडी पिशव्यांचे अनावरण करतांना मान्यवर




महाविद्यालाचे जे स्वच्छता दूत आहेत त्यांचे सत्कार करून कापडी पिशव्या प्रदान करण्यात आल्या.







रासेयो तर्फे बनविण्यात आलेल्या कापडी पिशवी व फलक जे कि महाविद्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आले आहे. महाविद्यालयातील प्रत्येक विभाग प्रमुखांना एक पोस्टर व एक कापडी पिशवी देऊन प्लास्टिक बंदी घालण्याचे आव्हान करण्यात आले.







स्वच्छता रेली ची सुरवात अकोला महानगरपालिका आयुक्त मा. श्री. कापडणीस यांनी हिरवी झेंडी दाखवून केली, त्यावेळी मा. प्राचार्य डॉ. नानोटी, कार्य. अधि. डॉ रश्मी जोशी, डॉ' समाधान मुंडे, प्रा. शैलेश जैस्वाल, प्रा. सोनाली गवांदे व इतर माण्यावारांसोबत १५० लोकं सामील झाले होते.





रेली चे मार्गदर्शन करतांना रासेयो चे सह कार्य. अधि.प्रा. शैलेश जयस्वाल व स्वयंसेवक.

सिविल लाईन चौकात पथनाट्याचे सादरीकरण करतांना विद्यार्थी.





**अकोला बस स्थानकावर श्री. रा.ल.तो. महाविद्यालयाच्या रा.से.यो चमू द्वारा "Single Plastic Ban" करण्याकरिता पोस्टर्स आणि घोश्वाक्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.**







**स्वच्छता रेली मध्ये १४० लोकांचा सहभाग होता. दोन विद्यार्थ्यांना महात्मा गांधी आणि संत गाडगे महाराज ह्याच्या वेशभूषेत तयार केले होते व ते रेली चे आकर्षण ठरले. महानगरपालिकेची घनता गाडी सोबत होती व पूर्ण रस्ता स्वच्च्छ करत रेली अकोला बस स्थानकावर पोहोचली.**






**रासेयो च्या विद्यार्थ्यांनी "प्लास्टिक को हटाना है, देश को बचाना है..." ह्या सुंदर पथनाट्याच्या माध्यमातून लोकां मध्ये जनजागृती केली. ४ ते ५ ठिकाणी नाटकाचे सादरीकरण करण्यात आले.**





बस स्थानकावर स्वच्छता करतांना कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे तसेच डॉ. सुधीर कोह्चाले व  महात्मा गांधीजींच्या व गाडगे महाराजांच्या वेशभूषेतिल स्वयंसेवकांनी सुद्धा स्वच्छता केली.



रा.से.यो.च्या अपोती खुर्द, दत्तक ग्राम येथे SGBAU अमरावती रा.से यो. चे प्र. संचालक मा. श्री. राजेशजी बुरंगे, मा. डॉ. राजीवजी बोरकर, क्षे. समन्वयक डॉ. बोबडे व डॉ. कोह्चाले ह्यांना कापडी पिशवी प्रदान करतांना रासेयो चे अधिकारी.



२०१८-१९ चे स्वच्छतेचे सलग तिसऱ्यांदा पुरस्कार, मा. कुलगुरू SGBAU अमरावती श्री मुरलीधरजी चांदेकर ह्यांच्या हस्ते स्वीकारतांना मा. प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी व रासेयो ची चमू.

अकोला प्लस | शनिवार, ५ ऑक्टोबर २०१९

दै. तरुण भारत

# शालतोंच्या रासेयो पथकाने राबविले नो प्लॅस्टिक अभियान



कार्यक्रमात बोलताना मनपा आयुक्त कापडणीस

• अकोला, ५ ऑक्टोबर

लाल बहादूर शास्त्री जयंती व महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून येथील शालती विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे व मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी तर प्रमुख पाहुणे मनपा आयुक्त संजय कापडनीस, हे होते. यावेळी प्रबंधक अनुप देशमुख, जयकुमार अग्रवाल, समीर शहा, महेंद्र खेतान, प्रा.गोखले, रासेयो क्षेत्रीय समन्वयक डॉ.सुधीर कोहचाडे, डॉ.समाधान मुंडे आदी उपस्थित होते.

महात्मा गांधी यांच्या १५० जयंती निमित्त प्लॅस्टिक पिशव्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली. व रासेयो तर्फे तयार करण्यात आलेल्या कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. म.न.पा.आयुक्तांच्या उपस्थितीत प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांनी सर्व प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्लॅस्टिक बंदी करण्याबाबत शपथ दिली.

आपल्या मनोगतातून आयुक्त संजय कापडनीस यांनी उपस्थितांना आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आवाहन केले.यावेळी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवणारांचा आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.शैलेश जैस्वाल यांनी केले. यानंतर म.न.पा आयुक्त कापडनीस यांनी स्वच्छता रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीस सुरुवात झाली. रॅलीमध्ये रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छतेवर आधारित विविध घोषवाक्य लिहिलेले पोस्टर्स होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक को हटाना है, देश को बचाना है, असे नारे देवून जनतेला प्लॅस्टिक बंदीचा संदेश दिला. दहा स्वयंसेवकाच्या एका चमूने ठिकठिकाणी प्लॅस्टिक बंदीवर आधारित पथनाट्य सादर करून स्वच्छता केली. हे सादरीकरण मुख्य बसस्थानक, सिव्हील लाईन परिसरात करण्यात आले. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे, प्रा.सोनाली गवादे, डॉ.रोहित अग्रवाल तसेच रासेयोच्या स्वयंसेवकांनी यात सहभाग घेतला. ◂(तभा वृत्तसेवा)

# रासेयो पथकाकडून नो प्लास्टिक स्वच्छता अभियान

। अकोला दि. ४



लाल बहादूर शास्त्री जयंती व महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे थोर पुरूषांचे अभिवादन कार्यक्रम तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी तर प्रमुख पाहुणे संजय कापडणीस हे होते.

यावेळी लायन्स क्लब अध्यक्ष अनुप देशमुख, जयकुमार अग्रवाल, समीर शहा, महेंद्र खेतान, प्रा.गोखले डॉ. सुधिर कोहचाळे, डॉ.समाधान मुंडे आदी उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या १५० जयंती निमित्त महाविद्यालयातून प्लास्टिक पिशव्यांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली. प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांनी उपस्थित सर्व प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्लास्टिक बंदीबाबत शपथ दिली. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शैलेश जैस्वाल यांनी केले. यानंतर आयुक्त कापडणीस यांनी स्वच्छता रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीस सुरूवात झाली. रॅलीमध्ये रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छतेवर आधारित विविध घोषवाक्य लिहिलेले पोस्टर्स रॅलीत होते. रासेयोचे स्वयंसेवक राम काळमेघ यांनी महात्मा गांधी यांची तर कुलदीप राजगुरू यांनी संत गाडगे महाराज यांची वेशभूषा केली, हे रॅलीचे मुख्य आकर्षण ठरले.

दै. मातृभूमि
5/10/2019

सकाळ

अकोला, शुक्रवार,
२ ऑगस्ट २०१९


# अमरावती विभागातील नऊ महाविद्यालयांना पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत असलेल्या अमरावती विभागातील ९ महाविद्यालयांची जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. तर कारंजा लाड येथील श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाला विद्यापीठस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला.

मुख्यमंत्र्यांनी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत केलेल्या आवाहनानुसार 'स्वच्छ भारत स्वस्थ भारत' अभियान यशस्वी करावयाचे आहे. विद्यार्थी, शिक्षक व परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छता अभियान यशस्वी करावयाचे असते. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी गठित केलेल्या समितीच्या सभेत जिल्हास्तरीय स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान पुरस्काराची घोषणा केली. यामध्ये जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर व प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनिजमेंट बडनेरा (जि. अमरावती), श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला आणि राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय अकोला तसेच श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगावराजा व सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव (जि. बुलडाणा), आबासाहेब पारवेकर कला-वाणिज्य महाविद्यालय यवतमाळ, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय कारंजा लाड व मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (जि. वाशीम) या नऊ महाविद्यालयांना जिल्हास्तरीय स्वच्छ भारत अभियान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात करण्यात येणार आहे.

**सोमवारी पुरस्काराचे वितरण**

कुलगुरूंच्या अध्यक्षतेत सोमवारी (ता. ५) सकाळी ११ वाजता विद्यार्थी भवन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेचे आयोजन करण्यात आले आहे.